# bhavishyavani भविष्यवाणी

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक मे २००९

अंतरंग –


- फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्प – टाटा इनोव्हिस्टा २००९ च्या विभागीय फेरीत दाखल झाल्याबद्दल सर्व संघाचे अभिनंदन.
- गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - नवीन व्यवसायात प्रोत्साहन देण्याचे मार्गक्रमण
- नंदुरबार जिल्हयातील १४३ गावांत 'हात धुणे' मोहीम पूर्ण झाली.
- धारावीतील डे केअर सेंटर्स - मुलांमध्ये प्रगती
- बांधकाम प्रकल्पांवरील डे केअर सेंटर्स


## आजपर्यंत

### टाटा इनोव्हिस्टा २००९ च्या विभागीय फेरींमध्ये 'फूड डायव्हर्सिफिकेशन' प्रकल्पाची निवड :-



'ताज' गट आणि एकात्मिक बाल विकास कार्यक्रमातील लोकांनी फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्प पुढे नेण्यासाठी जे प्रयत्न केले, त्याबद्दल भविष्य अलायन्सतर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन! फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्प, हा एक सामाजिक, नाविन्यपूर्ण प्रकल्प आहे हे ओळखून नाविन्यपूर्ण व्यवसाय स्पर्धेत या प्रकल्पास भाग घेण्यासाठी बोलावल्याबद्दल भविष्य अलायन्सतर्फे टाटा ग्रुप इनोव्हेशन फोरम 'टाटा इनोव्हिस्टा २००९ 'चे मन:पूर्वक आभार!

### ताज हॉटेलच्या सी.एस.आर कडून मिळालेले हे पत्र

प्रिय श्री.मूर्ती,

आमचा आनंद आणि उत्साह आम्ही तुमच्यासह व भविष्य अलायन्सच्या सर्व भागीदारांसह वाटून घेऊ इच्छितो.

आमचा पोषणास पूरक खाणे देण्यासंबंधीचा एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाच्या भागीदारीतील नाविन्यपूर्ण कार्यक्रम टाटा इनोव्हिस्टा – २००९ च्या विभागीय फेरीमध्ये पोहोचला आहे. टाटा इनोव्हिस्टा हे एक नाविन्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित व प्रोत्साहित करणारे व इतरांपर्यंत पोहोचवणारे टाटा हाऊसचे व्यासपीठ आहे. नवीन कल्पना, उपक्रम व प्रयासांना त्यांच्याकडून उत्तेजन मिळते व त्यांचे कौतुक केले जाते.

आम्ही जरी अंतिम फेरीत पोहोचू शकलो नाही तरी आम्ही केलेली सुरुवात, अनेकांच्या विचारांना चालना देऊन गेली आणि अनेकांनी त्यांत उत्सुकता वाटत आहे.सर्वात महत्वाचे म्हणजे, ह्या सामाजिक उपक्रमाने नाविन्यपूर्ण व्यवसाय स्पर्धेत भाग घ्यावा अशी एक छोटी सुरुवात आम्ही करु शकलो आहोत.

हया नाविन्यपूर्ण उपक्रमातील आमचे सर्व साथीदार व संबंधितांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्यांचे आभार मानतो.

सदिच्छांसहित - फोरम नागोरी, सी.एस.आर., ताज हॉटेल्स

### गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - नवीन व्यवसायात प्रोत्साहन देण्याचे मार्गक्रमण :-

जवळपास सर्वच जी जी जी तालुक्यातील पहिला टप्पा पूर्ण होत आला आहे. हया किशोरवयीन मुलींच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी काही व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन मिळू शकेल असे उपक्रम करुन पहिला टप्पा संपवायचा असे भविष्य अलायन्सने ठरवले आहे.

हया हेतूसाठी भविष्य अलायन्सनें 'ॲण्टस ॲण्ड पार्टनर्स', (उपजीविकेच्या क्षेत्रामधे अथपासून इतिपर्यंत सेवा देण्याचा अनुभव असलेला, विकासाच्या क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील व्यावसायिक व्यक्तींचा वैविध्य असलेला एक गट) यांचे सोबत भागीदारी केली आहे. यामध्ये किशोरवयीन मुलींची सध्याची कौशल्ये आणि आकांक्षांची माहिती घेतली जाईल. प्रकल्पक्षेत्रात उपलब्ध स्थानिक संसाधने आणि संधींची माहिती घेतली जाईल. त्यानंतर त्यांची कौशल्ये आणि संधींचा फायदा करुन घेण्याच्या दृष्टीने नवीन उपक्रम विकसित केला जाईल. 'ॲण्टस ॲण्ड पार्टनर्स' मधील गट आता हया भागांना भेटी देत आहे.

**नंदुरबार जिल्हयातील १४३ गावांत 'हात धुणे' मोहीमेची सांगता :-**

युनिसेफच्या स्वयंसेवकांनी नंदुरबार जिल्हयातील १४३ गावांमध्ये (नवापूरमधील ४० गावे, धडगावमधील ६२ गावे आणि तळोद्यामधील ४१ गावे) गावाच्या सूक्ष्म नियोजन अभ्यासांत 'हात धुणे' मोहिमेचा एक भाग म्हणून समावेश पूर्ण करण्यात आला आहे. हया पाच दिवसांच्या प्रक्रियेमध्ये सर्व १४३ गावांतील जवळपास सर्व मुले , माता आणि उत्पन्नधारकांना कोणत्या न कोणत्या वेळेस संपर्क साधण्यात आला आहे. हात धुण्याची साधने प्रेरकांना उपयुक्त वाटत आहेत. सर्वच साधनांचा उपयोग केला जात नसला तरी काही साधने इतरांपेक्षा जास्त वेळा वापरली जात आहेत, अधिक पसंत केली जात आहेत.

नवापूरमधील एकात्मिक बाल विकास कार्यक्रमातील पर्यवेक्षकांनी, जून २००९ मध्ये नवापूरमधील १५ अहेतूपूर्वक निवडलेल्या गावांमध्ये 'हात धुणे' कार्यक्रमाचे परीक्षण करण्याची तयारी दाखवली आहे. हया गावांमधे सूक्ष्म नियोजन प्रक्रिया घेण्यात येणार आहे. जिल्हयात हात धुणे प्रकल्पास गती मिळाल्याचे आढळून येते. नंदुरबारचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ही प्रतिकृती जिल्हयातील सर्व शाळांत व अंगणवाडी केंद्रात राबविण्यास उत्सुक आहेत. त्यांच्या पुढाकारामुळे, जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्रांना, शोषखड्डा आणि हात धुण्यासाठी भांडे (पाणी वगैरे बाहेर पडण्यास वाट असलेले भांडे) पुरविले जातील. मुलांना हात धुण्याची सवय लागण्यासाठी अशा प्रकारच्या पुढाकारामुळे खूप मदत मिळाली असून त्याचे महत्त्वही वाढले आहे.

**धारावीतील डे केअर सेंटर्स - मुलांमध्ये प्रगती:-**

एकात्मिक बाल विकास कार्यक्रम आणि स्नेहा यांनी संयुक्तरीत्या सुरु केलेली डे केअर सेंटर्स उत्तमरीत्या सुरु आहेत. दाखल मुलांपैकी निम्म्यापेक्षा जास्त मुलांच्या वजनात सुधारणा आहे. डे केअर सेंटरमध्ये दाखल झाल्यापासून कोणीही मूल पोषणाच्या खालच्या दर्जात घसरलेले नाही. डे केअर सेंटरच्या उपक्रमाला दोन्ही वस्त्यांतून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. ज्या पालकांची (विशेषत: माता) मुले केंद्रात दाखल आहेत, ते पालक आपल्या पाल्यात सुधारणा होताना बघून आनंदित आहेत. एकात्मिक बाल विकास यंत्रणेसह स्नेहा संस्था हया भागातील डे केअर सेंटरमध्ये दाखल न झालेल्या कुपोषित मुलांच्या वजनाचे नियमित निरीक्षण करीत आहे.

मुंबई मोबाईल क्रेशेसने घेतलेले प्रशिक्षणामुळे दोन्ही डे केअर सेंटर्सच्या कामांमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून येत आहे. या चार महिन्यांच्या कालावधीत दोन्ही केंद्र शिक्षिका – सीमा व सुरेखा यांनी बालविकास, स्वच्छेतेचे महत्त्व, वेळापत्रक बनविणे, शिकविण्याची साधने, कमी खर्चाची साधने, मौजमजेने शिकणे आणि पपेट शोसारखी संवादपूर्ण माध्यमे इ. गोष्टींची माहिती मिळवली आहे. सेंटरमधील मुलांच्या वागण्याच्या पध्दतीतून बदल दिसून येत आहे. इतके उपयुक्त व उत्कृष्ट प्रशिक्षण घेतल्याबद्दल भविष्य अलायन्समार्फत मुंबई मोबाईल क्रेशेसचे अभिनंदन !

वस्तीतील मुलांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने काम करण्यासाठी सेंटरमध्ये वस्तीतील लोकांची बहुतेक करुन पालकांची एक पोषण समिती बनविण्यात आली आहे. अशा प्रकारच्या सेंटरमध्ये मुलांना दाखल करण्याचे महत्त्व आज वस्तीतील लोकांना समजून आले आहे.



साक्षी - डे केअर सेंटर मधील
१९ महिन्यांची मुलगी

**साक्षी – (वय – १९ महिने, पोषणाचा दुसरा दर्जा)** डे केअर सेंटरमध्ये सहा महिन्यांपूर्वी दाखल झाली. तेव्हा ती तिसऱ्या दर्जामध्ये होती. डे केअर सेंटरमधील खाऊ पचण्यास कठीण गेल्यामुळे तिला अपचन आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला ती खूप अस्वच्छ रहात असे. तिच्या आईला सेंटर शिक्षिकेने बोलावून घेतले आणि पोषणासंबंधी सखोल असे समुपदेशन त्यांना दिले. डे केअर सेंटरमधील पाच महिन्यांनंतर गेले दोन महिने साक्षी दुसऱ्या दर्जामध्ये आहे. तिचे पचन सुधारले असून , तिची भूकही वाढली आहे.-सीमा , डे केअर सेंटर शिक्षिका, धारावी.

## बांधकाम प्रकल्पांवरील डे केअर सेंटर्स:-



निर्माण, मुंबई मोबाईल क्रेशेस, एकात्मिक बाल विकास कार्यक्रम आणि बांधकाम व्यावसायिक यांच्या भागीदारीतून बांधकाम प्रकल्पांवरील तीन डे केअर सेंटर्स उत्तमरीत्या सुरु आहेत. ही तीन सेंटर्स जवळपास ३६० मुलांची पोषणाची आणि विकासाची गरज भागवत आहेत. त्या ३६० पैकी १७५ मुले सहा वर्षांखालील आहेत. प्रतीक्षानगर आणि गणेशनगर मध्ये बांधकाम प्रकल्पांवर स्थापन झालेले नवीन स्वयंसहायता गट तर खारघर येथे एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाचा अस्तित्वात असलेला गट मुलांना खाऊ पुरवितो. मुलांमध्ये सुधारणा दिसून येत आहे पण तरी या मुलांचा दीर्घ काळ पाठपुरावा ठेवणे कठीण आहे कारण डे केअर सेंटरमध्ये दरमहा काही नवीन मुले दाखल होतात तर काही सोडून जातात कारण त्यांचे पालक दुसरीकडे किंवा दुसऱ्या गावी कामाला जातात. काही महिने नियमित असणारी मुले खूप थोडी आहेत. सेंटरमध्ये असताना मुलांची योग्य ती काळजी घेणे, त्यांना आवश्यक ते पोषण देणे, पूरक जीवनसत्वे देणे आणि आरोग्य सुविधा पुरविणे, हे निश्चित कले जाते. मातांचे आरोग्यसंबंधी ज्ञान वाढविण्यासाठी पालकसभेमध्ये आरोग्य , पोषण शिक्षण आणि बालविकास अशा विषयांवर चर्चा केली जाते.

## प्रतीक्षानगर मधील स्वयंसहायता गट आता प्रोत्साहित आहे –



निर्माण प्रतिनिधी व मुंबई मोबाईल क्रेशेसची प्रकल्पाधिकारी नीता,स्वयं सहाय्यता गटास झालेला खर्च आणि मिळवलेल्या नफ्याचा हिशोब समजावून सांगताना.

मुंबई मोबाईल क्रेशेस आणि निर्माण यांच्याकडून स्वयंसहायता गटांस अंदाजपत्रक, हिशोब आणि पाककृतीबद्दल सतत मार्गदर्शन मिळत आहे. त्यामुळे डे केअर सेंटर मध्ये द्यायच्या पूरक खाण्याच्या मुंबई मोबाईल क्रेशेस आणि एकात्मिक बाल विकास कार्यक्रमातून मिळालेल्या पैशातून खाण्याचा दर्जा चांगला ठेऊन , स्वयंसहायता गटांना नफा मिळू लागला आहे. डे केअर सेंटरमध्ये जेव्हा हया बायका जेवण बनवायला येतात तेव्हा त्यांचा रोजगार बुडतो. अशा वेळेस पैशांशिवाय त्यांचा उत्साह टिकवून ठेवणे कठीण होते. जेवण बनविणाऱ्या पाच बायकांनी हा नफा वाटून घेतला असून, त्यामुळे त्यांचा उत्साह टिकून रहाण्यास मदत झाली आहे.

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२-२७८२४६२९